# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:25.11.2025** **वार:मंगळवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज अयोध्येत श्रीराम मंदिरावर ध्वजारोहण
2. छत्तीसगडमध्ये 15 नक्षलवाद्यांची पोलिसांसमोर शरणागती
3. ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र काळाच्या पडद्याआड; देशभरातून शोकभावना आणि
4. भारताच्या महिला कबड्डी संघाची सलग दुसऱ्यांदा विश्वचषकाला गवसणी

**पंतप्रधान-अयोध्या**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उत्तर प्रदेशांतील अयोध्या इथल्या श्री राम मंदिराला भेट देणार आहेत. त्यांच्या हस्ते श्रीराम मंदिरावर ध्वजारोहण होणार आहे. मंदिराचं बांधकाम पूर्ण झाल्याचं प्रतीक म्हणून राम मंदिराच्या कळसावर हे औपचारिक ध्वजारोहण होणार आहे. मंदिराच्या आवारात स्थापन करण्यात आलेल्या सप्तमंदिराला अर्थात महर्षि वाशिष्ठ, महर्षि विश्वामित्र, महर्षि अगस्त्य, महर्षि वाल्मिकी, देवी अहिल्या, निशादराज गुहा, आणि माता शबरी यांच्या मंदिरांनाही पंतप्रधान भेट देणार आहेत. त्यानंतर आज संध्याकाळी पंतप्रधान कुरुक्षेत्र इथं गुरु तेग बहाददूर यांच्या 350व्या शाहिद दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या कार्यकामात ते गुरु तेग बहाददूर यांच्यावरील एक नाणे आणि विशेष टपाल तिकीटाचं अनावरणही करणार आहेत. पांचजन्य या स्मारक स्थळाचं उद्घाटनही आज पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

**नक्षलवादी समर्पण**

छत्तीसगडमध्ये सुकुमा जिल्ह्यात काल 15 नक्षलवाद्यांनी पोलिस अधीक्षक किरण चव्हाण यांच्या समोर आत्मसमर्पण केलं. यामध्ये 10 पुरुष आणि 5 महिलांचा समावेश आहे. यापैकी काही नक्षलवाद्यांवर 8 लाखांच बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं. माडवी हिडमा या नक्षलवाद्याच्या हत्येनंतर निर्माण झालेल्या भीतीमुळं या नक्षलवाद्यांनी समर्पण केलं असल्याचं पोलिस अधीक्षक चव्हाण यांनी सांगितलं. छत्तीसगडमध्ये आत्तापर्यंत 650 नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं आहे.

दरम्यान सशस्त्र संघर्ष सोडून मुख्य प्रवाहात येण्याची आपली इच्छा असून 15 फेब्रुवारी 2026 पर्यंत सुरक्षा दलांची कारवाई स्थगित करावी अशी मागणी करणारं पत्रक नक्षली संघटनेच्या एमएमसी झोन अर्थात महाराष्ट्र-मध्यप्रदेश-छत्तीसगड प्रदेश समितीने तिन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या नावे जारी केलं आहे. अनंत या नावाने नक्षली प्रवक्त्याने हे पत्रक जारी केलं आहे. सशस्त्र संघर्षाला विराम देण्याची आपली इच्छा असून आपसात संवाद साधण्यासाठी फेब्रुवारी पर्यंतची वेळ हवा असल्याचं या पत्रकात म्हटलं आहे.

**रब्बी पिकं**

देशभरात या महिन्याच्या 21 तारखेपर्यंत 3 कोटी 6 लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर रब्बी पिकांची पेरणी झाली असल्याचं सरकारनं प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटलं आहे. त्यापैकी जवळपास 73 लाख हेक्टर क्षेत्रावर कडधान्यांची लागवड करण्यात आली आहे, 19 लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रात भरड धान्याची तर 76 लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर तेलबियांची लागवड झाली असल्याचं कृषी विभागानं प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटलं आहे.

**कामगार संहिता-प्रतिक्रिया**

गेल्या आठवड्यात देशभरात लागू झालेल्या नवीन कामगार संहितांचं सर्व थरातून स्वागत होत आहे. नव्या कामगार संहिता हे कौतुकास्पद पाऊल असल्याचं एअर इंडिया एअरक्राफ्ट इंजिनिअर्स असोसिएशनचे सरचिटणीस एस.एन. भट्ट यांनी म्हटलं आहे. यामुळं गिग कामगार, प्लॅटफॉर्म कामगार आणि सर्व असंघटित क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना समानता मिळाली आहे, असंही त्यांनी नमूद केलं. नॅशनल फ्रंट ऑफ ट्रेड युनियनचे राष्ट्रीय सचिव राकेश मणी यांनी नव्या कामगार संहिता भविष्यात कामगारांसाठी खूप फायदेशीर ठरतील, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. उद्योग आणि संस्था संघटनेनंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून या चार कामगार संहितांची प्रशंसा केली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष एसके शर्मा यांनी या निर्णयाला ऐतिहासिक म्हटले आहे. आधुनिक, पारदर्शक आणि न्याय्य कामगार चौकट तयार करण्यासाठी सरकारचा दूरदर्शी दृष्टिकोन यातून दिसून येत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. या संहितांमुळे महिलांना कामाच्या ठिकाणी अधिक सुविधा प्राप्त होणार आहेत. याबाबत अधिक माहिती देताना ज्येष्ठ विधीज्ञ ॲडव्होकेट उदय वारुंजीकर म्हणाले....

**चार समित्यांमध्ये अन्य अस्तित्वात असणारे जे जुने कायदे होते ते सगळे एकत्र करून त्याच्याबरोबरीनं काही नवीन तरतुदी त्याच्यामध्ये घेण्यात आलेल्या आहेत वेतनाच्या संदर्भातला कायदा आहे त्याच्याबाबतीमध्ये वेगवेगळे चार केंद्रीय पातळीवरचे कायदे होते या चारही कायद्यांना एकत्र करण्यात आलं त्याच्याबरोबरीनं काही नवीन संकल्पना त्याच्यात घालण्यात आल्या आणि मग त्याच्या प्रमाणात आता वेजेस कोड वेतनाच्या संदर्भातला संहिता दोन हजार एकोणीस सालामध्ये तयार करण्यात आली. वेज कोड बिल म्हणतंय की महिलांना पुरुषाच्या बरोबरीनं देखील आता वेतन मिळणार आहे फ्लोर वेजेस या नावाची एक संकल्पना आणलेली आहे की ज्याच्यामुळं जर तुमच्या भागामध्ये जर काही विशेष मागासलेला भाग भाग आहे तर त्या ठिकाणी असणारा मिनिमम वेजेस हे थोडेसे वेगळे असू शकतात जो प्रगत भाग आहे तर त्या ठिकाणचे वेजेस जास्त असू शकतात या प्रकारची देखील त्याच्यामध्ये कल्पना करण्यात आलेली आहे आणि सगळ्यात मोठं महत्त्वाची तरतूद म्हणजे की जे किमान वेतन ठरवण्याची जी प्रक्रिया आहे ती प्रक्रिया अत्यंत सुलभ या वेजेस कोड च्या माध्यमातून तयार करण्यात आलेली आहे.**

नवीन कामगार संहितांच्या अनुषंगानं ॲडव्होकेट उदय वारुंजीकर यांची मुलाखत विशेष वार्ता या कार्यक्रमात उद्या सकाळी दहा वाजता आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून प्रसारित केली जाणार आहे.

**इफ्फी**

गोव्यात सुरू असलेल्या 56व्या इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदा प्रथमच कृत्रिम बुद्धिमत्तेवरील म्हणजे एआय हॅकेथॉनचं आयोजन करण्यात आलं आहे. या महोत्सवात मुलांचे प्रश्न, आव्हानं आणि संधी यावरील पाच चित्रपट काल दाखवण्यात आले. भारत, कोसोवो, इजिप्त, दक्षिण कोरिया अशा विविध देशांमधील हे चित्रपट होते. घर हा कोंकणी भाषेतला लघुपटही काल दाखवण्यात आला.

**माहे-युद्धनौका**

माहे ही युद्धनौका काल मुंबईत नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली. यात 80 टक्क्यापेक्षा जास्त सामग्री स्वदेशी बनावटीची आहे. मलबार किनारपट्टीवरच्या माहे या ऐतिहासिक गावावरून हिचं नाव ठेवण्यात आलं आहे. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्या हस्ते ही नौका नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली. देशाच्या सागरी सीमांच्या रक्षणासाठी समर्पित ही युद्धनौका पश्चिम किनाऱ्यावर तैनात असणार आहे.

**ट्रंप-मुस्लिम**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी मुस्लिम ब्रदरहूडच्या काही शाखांना परदेशी किंवा जागतिक दहशतवादी संघटना म्हणून घोषित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. व्हाईट हाऊसच्या एका अहवालानुसार राष्ट्राध्यक्ष ट्रंप यांच्यासमोर मुस्लिम

ब्रदरहूडच्या विविध संघटनांचचं मोठं आव्हान असून मध्य पूर्वेतील अमेरिकेच्या मित्र राष्ट्रांमध्ये या संघटना दहशतवाद आणि अस्थिरता निर्माण करत आहेत.

**<u>धर्मेंद्र निधन</u>**

भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, धर्मेंद्र यांचं काल मुंबईत राहत्या घरी निधन झालं. ते 89 वर्षांचे होते. काही दिवसांपूर्वीच रुग्णालयातील उपचारांतर ते घरी परतले होते. त्यांच्या पार्थिव देहावर काल दुपारी मुंबईत अंत्यसंस्कार करण्यात आले. कुटुंबिय, नातेवाईक आणि निकटवर्तीयांच्या उपस्थितीत या दिग्गज अभिनेत्याला अंतिम निरोप देण्यात आला. धर्मेंद्र यांच्या निधनानंतर संपूर्ण चित्रपटसृष्टीत आणि देशभरातील चाहत्यांमध्ये शोककळा पसरली आहे. अनेक नामवंत कलाकार, दिग्दर्शक आणि राजकीय व्यक्तींनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. धर्मेंद्र यांच्या जाण्यानं हिंदी सिनेमातील एक अजरामर युग संपल्याची भावना व्यक्त होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री, राज्याचे मुख्यमंत्री आणि सिनेजगतातील मान्यवरांनी या दिग्गज कलाकाराला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**<u>डीजीसीए-विमान वाहतूक सल्ला</u>**

ज्वालामुखीच्या राखेमुळे मस्कत आणि आसपासचे विमान वाहतूक क्षेत्र प्रभावित झालं असून सर्व भारतीय विमान वाहतूक कंपन्यांनी हे क्षेत्र टाळावे तसंच अशा परिस्थितीत घेतली जाणारी सर्व दक्षता काटेकोरपणे बाळगावी असा इशारा विमान महासंचालनालयानं दिला आहे. ज्वालामुखीचा उद्रेक किंवा राखेचा ढग यामुळं विमानांसाठी धोका निर्माण होतो, तेव्हा देण्यात येणारा अष्टम हा विशेष संदेशही भारतीय विमानतळ प्राधिकरण आणि टूलूस येथील ज्वालामुखी राख सल्लागार केंद्रानं दिला आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात गुवाहाटी इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या कालच्या तिसऱ्या दिवसअखेर भारताचा संपूर्ण संघ 201 धावांवर बाद झाला, त्यामुळे दक्षिण आफ्रिकेचा संघ 314 धावांनी आघाडीवर आहे. काल दिवस अखेर दक्षिण आफ्रिकेच्या 8 षटकांत 26 धावा झाल्या आहेत.

**<u>डेफ-ऑलिंपिक</u>**

जपानमध्ये टोकिओ इथं सुरू असलेल्या, डेफ-ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेत भारताच्या प्रांजली धुमाळनं महिलांच्या 25 मीटर पिस्टल नेमबाजीत सुवर्ण पदक पटकावलं. या स्पर्धेतलं तिचं हे तिसरं पदक आहे. याआधी तिनं एकसुवर्ण आणि एक रौप्य पदक पटकावलं आहे. पुरुषांच्या 97 किलो फ्री स्टाईल कुस्तीत सुमीत दहियानं सुवर्ण पदक पटकावलं, तर 86 किलो फ्री स्टाईल कुस्तीत अमितनं रौप्य पदक पटकावलं.

**<u>कबड्डी</u>**

भारताच्या महिला कबड्डी संघानं सलग दुसऱ्यांदा कबड्डी विश्वचषकाला गवसणी घातली आहे. ढाका इथं झालेल्या सामन्यात त्यांनी काल चायनीज तैपेईच्या संघावर 35- 28 अशी मात केली. या स्पर्धेतल्या सर्व सामन्यात भारतीय संघ अजिंक्य राहिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कामगिरीबद्दल भारतीय संघाचं अभिनंदन केलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,

# नमस्कार.